ISSN: 2454-5503

IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 8 | ISSUE 6| NOV - DEC 2022

**Book 4**



*Editor in Chief*

Dr Kalyan Gangarde

*Guest Editors*

**Dr.Chandrashekhar Kanase**

**Dr.Shivanna S.**

IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 8 ISSUE 6 NOV - DEC 2022

A Bimonthly Peer Reviewed International Journal

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**
Director, CHCS, Kalyan, Dist. Thane

*Issue Editors*

**Dr.Chandrashekhar Kanase**
Head and Research Guide
Dept. of Dramatics, SPP Mahavidyalaya, Sirsala, Dist. Beed (MS)

**Dr.Shivanna S.**
Assistant Professor
Dept. Of Performing Arts, Banglore University, Bangluru.

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

Lal Bahadur Shastri Dhepaganesh Warpudkar ACS College, Sonpeth, Pin-431516, Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor:*
**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr. Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr. Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded
**Dr Rajiv Kumar,**
Associate Professor, Dept. of English, S.K.M University, Dumka, Jharkhand
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Dr Ramkishan Bhise,** Assistant Professor, SIES Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| **Subscription Rates** | |
|---|---|
| | Annual membership (Individual) Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist Parbhani 431516


21. A Study of Impact of Central Bank Digital Currency (CBDC)
**Dr. Satyakumar Gopikishan Rathi** 74

22. An Overview of Inflation in India and China: Study for The Period 2004-2013
**Dr. S. L. Kundalwar** 76

23. A Study of Entrepreneurship Awareness with Special Reference to Commerce Graduate Students in Latur District
**Dr. Naresh V. Pinamkar** 79

24. Impact of Covid-19 on Higher Education in India
**Dr. Bhagat P.S.** 82

25. आर्थिक आरक्षणाचा अन्वयार्थ
**प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही** 86

26. शाश्वत आर्थिक विकास आणि पर्यावरण रक्षण यांच्यातील सहसंबंधाचे आर्थिक अध्ययन
**प्रा. डॉ. रमेश शिंदे** 89

27. राष्ट्रसंत तुकडाजींच्या कवितेतील जनवादीविचार
प्रा. डॉ. कल्याण गोपनर 92

28. चणकापूर- चौरंगी लढ्याचे ऐतिहासिक सत्य
**गजानन गणपत होडे** 96

29. छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरण, जलसंवर्धन धोरण व सध्यस्थिती
**प्रा.डॉ.कदम मोतीराम विठ्ठलराव** 101

30. पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर जीवन आणि कार्य - एक ऐतिहासिक अभ्यास
सतिश नामदेवराव आत्राम 103

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



25

# आर्थिक आरक्षणाचा अन्वयार्थ

**प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही.**
राज्यशास्त्र विभाग
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ

**प्रस्तावना :-** समकालीन भारतीय राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण एका महत्वपूर्ण बाबीने व्यापून टाकले आहे ते म्हणजे आरक्षण (Reservation) या होय.भारतातील सर्वच समाजघटकांना सरकारी नोकरी आणि शिक्षणात आरक्षण पाहिजे.यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. यासाठी मोर्चे, आंदोलने, जाळपोळ, उपोषणे,आत्मबलिदान यासारख्या विविध मार्गांचा अवलंब करण्यात येत आहे. याप्रयत्नात काही यशस्वी झाले तर काही अयशस्वी ठरले.पण तरीही आरक्षण ही बाब आपला पिच्छा सोडत नाही.महाराष्ट्रात मराठा समाज, गुजरात मध्ये पाटीदार समाज, राजस्थान मध्ये गुर्जर समाज आणि हरियाणा राज्यातील जाट समाज आरक्षण देण्याची मागणी करत आहेत.

महाराष्ट्रातील मराठा समाजाला १६% आरक्षण देणारा महाराष्ट्र सरकार चा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने असंवैधानिक ठरवला.याच दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने देशातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना १०% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला.आणि तो भारतीय संसदेत पारित करून घेतला.

७ नोव्हेंबर २०२२ रोजी भारतीय सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक निकषावर आधारित दिलेले आरक्षण वैध ठरवून हा विषय पुन्हा ऐरणीवर आणला आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या ४०० पानी निकाल पत्राने भारतीय समाजव्यवस्थेपुढे अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.यामध्ये प्रामुख्याने एक म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत संरचनेला (Basic Structure) हा निकाल प्रभावित करतो का? दोन म्हणजे या निकालामुळे ५०%आरक्षणाची सीमा ओलांडली आहे का?तिसरे म्हणजे या निकालामुळे सामाजिक न्यायाची जागा आर्थिक न्यायाने घेतली आहे का? चौथे असे की, या निकालामुळे येणाऱ्या काळात अस्तित्वात असलेले आरक्षण रद्द होईल का? आणि पाचवे म्हणजे या निकालामुळे खरोखरच गरिबाला लाभ होईल का? आर्थिक निकषावर आधारित आरक्षणात अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय घटकातील गरिबांना आरक्षण देता येईल का?

भारतीय सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक निकषावर आधारित आरक्षण दिलेल्या या निकालाचा येणाऱ्या काळात कसा परिणाम होतो हे पाहावे लागेल.

**महाराष्ट्रातील सध्याची आरक्षण स्थिती :-** केंद्रीय स्तरावर जे आरक्षण देण्यात आले आहे.ते चार संवर्गात दिले आहे.यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि आर्थिक दृष्ट्या मागासवर्ग असे सध्या आरक्षण स्थिती आहे.आणि महाराष्ट्र राज्यामध्ये पुढीलप्रमाणे सध्याची आरक्षण स्थिती आहे.

| संवर्ग/ संक्षिप्त नाव | एकुण जाती | एकुण आरक्षण |
|---|---|---|
| अनुसूचित जाती SC | ५९ | १३% |
| अनुसूचित जमाती ST | ४७ | ७.५% |
| इतर मागासवर्गीय OBC | ३४६ | १९% |
| विशेष मागासवर्ग SBC | ०७ | २% |
| विमुक्त जाती VJ A व तत्सम | १४ | ३% |
| भटक्या जाती NT B बंजारा व तत्सम जाती | ३७ | २.५% |
| भटक्या जाती NT C धनगर | ०१ | ३.५% |
| भटक्या जाती NT D वंजारी व तत्सम जाती | - | २% |
| आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग ESW | - | १०% |
| **एकुण आरक्षण** | | ६२% |

( **संदर्भ :-** **www.wikipedia.com** )

सध्या महाराष्ट्रात वरिल तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राज्यातील जनतेला आरक्षण देण्यात आले आहे.पुर्वी ५२% असलेले आरक्षण आर्थिक निकषावर आधारित १०% आरक्षण दिल्यामुळे ते आता ६२% येवढे झाले आहे.

**आर्थिक आरक्षणाचा इतिहास :-** भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात सामाजिक न्यायाची ग्वाही देण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यघटनेच्या अनुच्छेद 15 , 16, 19 अंतर्गत अनुसूचित जाती (Scheduled Caste) अनुसूचित जमाती(Scheduled Traibes) व इतर मागासवर्गीय(Other Backward classes) यांना नोकरी, शिक्षण व व्यवसायात आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हे आरक्षण देण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागास असणे आणि प्रशासनात अपर्याप्त प्रतिनिधित्व असणे हे निकष ठरवण्यात आले. यावेळी भारतीय घटना समितीने आर्थिक निकषावर आरक्षण देण्याचे अमान्य केले.

आर्थिक निकषावर आधारित समाजातील घटकांना आरक्षण देण्याची मागणी राष्ट्रीय सेवक संघ, जनसंघ, भारतीय जनता पार्टी यांनी वेळोवेळी केली आहे.पण या मागणीला मुर्त स्वरूप देण्याचे प्रयत्न १९९२ मध्ये पंतप्रधान पी.व्ही.नरसिंगराव यांनी केले.पण ते सर्वोच्च न्यायालयात टिकले नाही.

त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी सरकारने सन २००० मध्ये नेमलेल्या राज्यघटना पुनरावलोकन आयोग स्थापन करण्यात आला.या

आयोगाचे सदस्य सुभाष सी.कश्यप यांनी, "जातीच्या आधारावर दिले जाणारे आरक्षण ताबडतोब थांबविणे राजकीय दृष्ट्या शक्य नाही, म्हणून २०१५ पर्यंत ते हळूहळू जातीय आरक्षण नीतीचे योजनाबध्द रीतीने निर्गमन होईल अशी व्यवस्था करावी आणि २०१५ नंतर ही आरक्षण ठेवायचे असेल तर ते केवळ आर्थिक निकषावर ठेवण्यात यावे.असे सुचित केले होते."(Reforming the Constitution 1992)

स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात एक्केवीस वेळा आर्थिक निकषावर आधारित आरक्षण देण्यासंबंधी खाजगी विधेयक मांडण्यात आले.परंतु ते पास झाले नाही.८ जानेवारी २०१९ रोजी लोकसभेने ३२३×३ मतांनी १०३ वी घटनादुरुस्ती करून आर्थिक दृष्ट्या मागास वर्ग संवैधानिक संशोधन विधेयक २०१८ (Constitution Amendment Bill to Provide Reservation of Economic Weaker section 2018) हे पास झाले. लागलीच दुसऱ्या दिवशी राज्यसभेत आणि तिसर्या दिवशी राष्ट्रपतींनी सही करून मान्यता दिली. तेव्हा आर्थिक निकषावर आधारित आरक्षण देण्यासंबंधीच्या या विधेयकाला आव्हान देणार्या ४० याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या.

सदरील याचिकांवर सुणावनी करण्यासाठी पाच सदस्यीय खंडपीठाची स्थापना करण्यात आली.यात सरन्यायाधीश उदय लळीत,न्या.बेला त्रिवेदी,न्या.दिनेश माहेश्वरी,न्या.पारडीवाला आणि न्या.रविंद्र भट्ट यांचा समावेश होता.शेवटी या पीठाने ७ नोव्हेंबर २०२२ रोजी १०३ वी घटनादुरुस्ती ३:२ असा निर्णय देत हे संशोधन विधेयक संवैधानिक ठरविले.

**आर्थिक आरक्षणाचा अन्वयार्थ :-** देशातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण देण्याच्या घटनात्मक तरतूदीवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.यामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या खुल्या प्रवर्गातील घटकांना १०% आरक्षणाचा लाभ मिळणार आहे.पण प्रस्तुत आरक्षणामुळे घटनेतील सामाजिक न्यायाची शीतैशी होणार आहे.भारतीय घटनाकारांना अपेक्षित असलेला सामाजिक न्यायाची उपेक्षा होणार आहे.मुळात भारतीय घटनाकारांनी आरक्षणाची तरतूद यासाठी करण्यात आली होती की.ज्या समाज घटकांना हाजारो वर्ष शासन व प्रशासनात योग्य प्रतिनिधित्व मिळाले नाही अशांना तदनुषंगीक लाभ मिळाले पाहिजेत.त्यासाठी हे आरक्षण आहे.पण आर्थिक निकषावर आधारित आरक्षण हे या बाबींचा विचार करत नाही.

१६.११.१९९२ रोजी इंद्र साहनी विरूद्ध केंद्र सरकार व अन्य या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाच्या ११ सदस्य असलेल्या पुर्ण पीठाने असा निर्णय दिला की, अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय घटकांना ५२% पेक्षा अधिक आरक्षण देण्यात येऊ नये.या निर्णयामुळेच विविध घटक राज्यांनी दिलेले आरक्षण अवैध ठरविले.जसे की महाराष्ट्रातील मराठा समाजाला दिलेले आरक्षण ५२% पेक्षा अधिक होत आहे म्हणून अवैध ठरविले.परंतु आर्थिक निकषावर आधारित १०% आरक्षण दिल्यामुळे ते ५०%ची मर्यादा ओलांडत आहे.तेव्हा ते वरिल निर्णयाच्या विसंगत आहे.

याशिवाय आर्थिक निकषावर आधारित आरक्षणामुळे अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय घटकातील गरिबांना कोणतेही स्थान नाही.यासंदर्भात सिंघो आयोगाच्या अहवालानुसार देशात ३१ कोटी ७० लाख लोक दारिद्र्य रेषेखालील आहेत.यात त्यापैकी ७.७४ कोटी अनुसूचित जातीचे, ४.२५ कोटी अनुसूचित जमातीचे आणि १३.८६ कोटी इतर मागासवर्गीय लोकसंख्या आहे.याचा अर्थ एकूण देशातील दारिद्र्य रेषेखालील लोकांमध्ये ८१.५% प्रमाण हे यावरिल घटकांचे आहे.आर्थिक आरक्षणातून या गरिबांना वगळले गेल्यामुळे घटनेतील सामाजिक न्यायाचे तत्त्व व समानतेचे तत्त्व उल्लंघन होत आहे.याच संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, " शुद्र वा अतिशुद्र हे गरिब असल्यामुळे अस्पृश्य, मागास, अशिक्षित राहिले नाहीत तर अस्पृश्य, मागासवर्गीय असल्यामुळे गरिब, मागास, अशिक्षित राहिले".

कोणतेही आरक्षण हे त्या त्या घटकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दिले आहे.लोकसंख्येचे हे प्रमाण सन १९३१ च्या जातीय जनगणनेच्या आधारे ठरविण्यात आले आहे.यानुसार उच्च वर्णीय जातीचे प्रमाण हे १५ % आहे. त्यांना १०% आरक्षण देण्यात आले आहे.तर ५२% इतर मागासवर्गीय घटकांची लोकसंख्या असताना २७% आरक्षण देण्यात आले आहे.याचाच अर्थ सामाजिक आरक्षण देताना वेगळे निकष आणि आर्थिक आरक्षण देताना वेगळे निकष हे 'कायद्यापुढे सर्व समान' ( Rule of Law) हे तत्त्व सुद्धा नाकारले जाते.

वरील सर्व मुद्यांचा विचार केला तर हे सर्व मुद्दे भारतीय राज्यघटनेच्या पायाभूत संरचनेचे (Basic Structure) तत्व आहेत.आर्थिक निकषावर आधारित आरक्षण हे भारतीय राज्यघटनेच्या पायाभूत संरचनेत बसत नाही.असे असताना सर्वोच्च न्यायालयाने १०३ वी घटनादुरुस्ती वैध ठरवली आहे.यामुळे येणार्या काळात सामाजिक व शैक्षणिक आधारावर देण्यात आलेले आरक्षण धोक्यात येऊ शकते.ककिंवा ते बहुमताच्या जोरावर रद्दही केले जाईल.तेव्हा सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही.

**समारोप :-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने देशातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या खुल्या प्रवर्गातील घटकांना आर्थिक निकषावर आधारित १०% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला.त्या निर्णयाला भारतीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.त्यावर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने देण्यात आलेले आरक्षण वैध ठरवले.यामुळे येणार्या काळात भारताला सामाजिक आरक्षण रद्द करून आर्थिक निकषावर आरक्षण देण्याची मागणी वाढु शकते.यासाठी उजव्या विचारसरणीचे राजकीय पक्ष, संस्था आणि संघटना चळवळी निर्माण करून देशात अराजक निर्माण करू शकतात.

सरकारला खुल्या प्रवर्गातील घटकांच्या गरिबांना इतर सवलती देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणता आले असते.पण आर्थिक निकषाला वैध ठरवून सामाजिक आरक्षणाचा पायाच खिळखिळा झाला आहे.तसेच सामाजिक व शैक्षणिक निकष हे एकाएकी बदलता येत नाहीत किंवा ते बदलत नाहीत.पण आर्थिक निकषांबाबत असे निश्चित सांगता येत नाही.आर्थिक निकषावर आधारित आरक्षण दिल्यानंतर आता काही राजकीय पक्ष या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करत आहेत. यामध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम्.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे पक्ष या निर्णयाचा पुनर्विचार करावा अशी मागणी करत आहेत.

**सुची :**


१) www.bbc.com

२) www.wikipedia.com

३) www.maharastratimes.com

४) **आर्थिक आरक्षण दुर्बल की सक्षम – दीपक पळसुले**

५) **मंडल आयोग – श्रीराम ढवळीकर**

६) **आरक्षण - ॲड.अभया शेलकर**

७) **मंडल कमिशन रिपोर्ट – संपा.चंद्रभुषण सिंह यादव**

८) **http://bombayhighcourt.nic.in/libweb/acts/2004.08.PDF**

९) **https://www.youtube.com/watch?v=NgBwTjEEITQ**


❑❑❑

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist. Parbhani Pin-431516

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani